I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 200-205
A Double-Blind Peer Reviewed Journal
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# 'बारोमास' ग्रामीण कादंबरीतील निवडक पात्र चित्रण

सतीश स. कर्णासे[१] व डॉ. कोमल वी. ठाकरे[२]

[१]मराठी विभाग प्रमुख

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर

[२]सहयोगी प्राध्यापक,

तायवाडे महाविद्यालय महादुला, कोराडी

| Communicated : 01.04.2022 | Revision : 07.04.2022<br>Accepted : 12.04.2022 | Published : 02.05.2022 |
|---|---|---|

**सारांश :**

कोणत्याही कादंबरीतील पात्रे ही त्या कादंबरीची निर्मिती असते. कादंबरीत मुख्य पात्रे, गौन पात्रे, आणि इतर पात्रे असतात. 'बारोमास' मधील कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा विदर्भातील, मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातील आहेत. या कादंबरीमध्ये ९३ व्यक्तिरेखांचा समावेश करण्यात आलेला आहे. 'बारोमास' मध्ये एकनाथ, अलका, नानू आजचा, सुभानराव, शेवंता माय आणि मधु या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत. एकनाथ 'बारोमास' मध्ये शेतकरी कुटुंबातील सुशिक्षित पण बेरोजगार तरुणांचे प्रतिनिधित्व करतो. तो शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करतो. अलका भौतिक सुखाचे आकर्षण असणारी आणि बदलत्या स्त्रीचे प्रतिनिधित्व करणारी आहे. सुभानराव हे पात्र हायब्रीड शेतीचा पर्याय निवडणारे आहे. शेवंता माय ही कष्टकरी भारतीय शेतकरी स्त्रीचे प्रतिनिधिधीक खूप आहे. शेवंताबाई च्या माध्यमातून लेखकाने ग्रामीण भागातील स्त्री जीवनाची धडपड आणि ससेहोलपट प्रभावीपणे मांडली आहे. मधू हा सोनेरी टोळीचा मालक असून गुप्तधन शोधण्यासाठी रात्रीची भटकंती करणारा आहे आहे.

**बीजशब्द :** ग्रामीण, निर्मिती, पात्रे, संघर्ष, साहित्यकृती, बलस्थान, व्यवस्था, शेती, आत्महत्या, हायब्रीड, प्रतिनिधी, डोनेशन, बँका, पैसा, शेतकरी.

**प्रस्तावना :**

कोणत्याही साहित्यकृतीत व्यक्तिरेखांना (पात्रांना) महत्त्वाचे स्थान असते. कादंबरीतील पात्रे ही कादंबरीची निर्मिती असते.या निर्मितीमागे कादंबरीकाराचा विशिष्ट हेतू असतो. त्यामुळे कादंबरीत विविध पात्रे असली, तरी त्या त्या हेतूने त्यांना वेगळे महत्त्व दिलेले असते. काही व्यक्तिरेखा विशेष महत्त्वाच्या असतात, तर काही व्यक्तिरेखा कमी महत्त्वाच्या असतात. त्यांना गौण व्यक्तिरेखा म्हणतात. ई. एम. फास्टर यांनी कादंबरीतील पात्रांचे (व्यक्तिरेखांचे) दोन प्रकार सांगितले आहेत.

**(१) स्थिर पात्रे (मुख्य पात्रे/मुख्य व्यक्तिरेखा) :—**

स्थिर पात्रे ही कोणत्यातरी एखाद्या कल्पनेभोवती, वैशिष्ट्याभोवती रचलेली असतात. त्यांच्यात परिस्थितीत कसलाही बदल होत नाही. ही स्थिर पात्रे विनोदी असल्यामुळे अधिक ठसठशीत दिसतात.

**(२) गौन पात्रे :—**

ही पात्रे परिस्थितीनुसार बदलतात. गौण पात्रे गुंतागुंतीची असतात. त्यांच्या स्वभावातले वेग वेगळे गुणधर्म क्रमश: दिसतात. विकसित पात्रांच्या चित्रणातून घटना आणि वैयक्तिक यांच्या परस्पर प्रतिक्रिया दिसत जातात व मानवी स्वभावावर अधिक प्रकाश पडू शकतो उदा. वामन मल्हार जोशी यांच्या 'सुशीलेचा देव' या कादंबरीतील सुशीला हे पात्र गौण पात्राचे उत्तम उदाहरण आहे.

कादंबरीकार कथा वस्तूच्या व आशयाच्या मागणीप्रमाणे पत्रांचे नमुने उभे करत असतो. कादंबरीकारांवर मानवी मनाच्या वर्तनाचे ज्ञान असणे आवश्यक असते. हे ज्ञान असेल तरच कादंबरीकार पात्रे निर्माण करू शकतो. पात्रांचे स्वभावचित्रण करण्याचे हे दोन कौशल्य कादंबरीकार परंपरेकडून मिळालेल्या ज्ञानातून, सामाजिक व्यवहारातून आणि मानसशास्त्राच्या अभ्यासातून प्रतिभेच्या अंगभूत सामर्थ्याने मिळवले असते. कादंबरी कराचा पात्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन पात्रावर खोल संस्कार करीत असतो. कादंबरीकार पात्राकडे सहृदयतेने, सहानुभूतीने, उपहासात्मक दृष्टीने पाहत असतो. त्याचा या दृष्टिकोनाचा रंग पात्रे धारण करीत असतात.

**'बारोमास' कादंबरीतील पात्रे (व्यक्तिरेखा) :—**

सदानंद देशमुखांच्या 'बारोमास' कादंबरीतील प्रत्येक व्यक्तिरेखा ही अतिशय वास्तववादीआहे. बारोमास मधील काही व्यक्तिरेखा प्रभावी, तर काही व्यक्तिरेखा दुय्यम स्वरूपाच्या आहेत. या कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा ह्या

प्रामुख्याने विदर्भातील एका मध्यमवर्गीय आणि शेतकरी कुटुंबातील आहेत. सदानंद देशमुख यांनी 'बारोमास' मधून वास्तव समाजदर्शन घडवीत असतानाच या कादंबरीतील व्यक्तिरेखाही प्रभावीपणे साकारल्या आहेत. 'बारोमास' मध्ये प्रमुख, दुय्यम आणि इतर व्यक्तिरेखांची एकूण ९३ इतकी संख्या आहे. 'बारोमास' कादंबरीत पुरुष व्यक्तिरेखांची संख्या ७१ आणि स्त्री व्यक्तिरेखांची संख्या जवळपास २२ इतकी आहे. मोहाडी, सांजोळ आणि किंनखेड या गावातील अनेक व्यक्तींची चित्रने मोठ्या समरसतेने 'बारोमास' मध्ये आलेली आहेत. अगदी बारीक सारीक तपशील व्यक्त व्हावेत यासाठी लेखकाने पात्रांची केलेली रचना 'बारोमास' चे खास वैशिष्ट्य आहे. सदानंद देशमुख यांनी 'बारोमास' मध्ये चित्रीलेली पात्रे हे या कादंबरीचे फार मोठे बलस्थान म्हणावे लागेल. 'बारोमास' कादंबरी मधील व्यक्तिरेखांचे अभ्यासाच्या सोयीसाठी आपणाला तीन गट पाडता येतात. १. प्रमुख व्यक्तिरेखा २. दुय्यम व्यक्तिरेखा आणि ३. इतर व्यक्तिरेखा या तिन्ही गटांपैकी 'बारोमास' मधील काही ठळक व्यक्तिरेखांची माहिती थोडक्यात खालील प्रमाणे सांगता येईल. 'बारोमास' मधील एकनाथ, अलका, नानू आजा, सुभानराव, शेवंता माय आणि मधु या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत.

**(१) एकनाथ तनपुरे :–**

एकनाथ हे 'बारोमास' कादंबरीतील महत्त्वाचे पात्र आहे. तो शेतकरी कुटुंबातील सुशिक्षित तरुणांचा प्रतिनिधी आहे. त्याच प्रमाणे तो विस्कटलेल्या कृषी जीवनाचे आणि सद्यस्थितीतील ग्रामीण व्यवस्थेचेही प्रतिनिधित्व करतो. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये त्याने आपले एम. ए., बी. एड पर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले असते. शिक्षण घेत असताना त्याच्या समोर नोकरीचे स्वप्न होते. प्राध्यापक व्हावे असे त्याला मनापासून वाटत होते. परंतु शिक्षकाची नोकरी मिळविण्यासाठी भरावे लागणारे डोनेशनचे पैसे त्याच्याजवळ नसल्यामुळे त्याला शेवटपर्यंत नोकरी लागत नाही. आज ना उद्या नोकरी लागेल म्हणूनच मोहाडी येथील वीज मंडळात अधिकारी असलेल्या साहेबांच्या बी. एस.सी झालेल्या अलकाशी एकनाथ चा विवाह होतो. पाच–सहा वर्षे अशीच निघून जातात पण त्याला नोकरी काही लागत नाही. शेतीमध्येच कष्ट करीत राहतो. अलकाशी विवाह केल्यामुळे पुन्हा तो संसाराच्या गाड्यात अधिक रुतत जातो. पैसे भरल्याशिवाय नोकरी मिळत नाही म्हटल्यावर तो शेतातील कामे करू लागतो. कल्याणीच्या मळ्यावर त्याचा जीव असतो. त्याठिकाणच्या विहिरीला भरपूर पाणी असते. या मळ्यातील जमीनही काळी मऊसूत लोण्यासारखी असते. पिके सुद्धा या मळ्यात चांगली निघत होती. या मळ्यात काम करताना त्याचे मन रमत होते.

एकनाथला नोकरी नसल्यामुळे अलका त्याला सतत दूर लोटत राहते. शारीरिक गरज म्हणून जेव्हा तो अलका च्या जवळ जातो तेव्हा अलका त्याला झिडकारून लावते. चांगली नोकरी नसल्यामुळे उत्तम प्रकारे आयुष्यही त्याला जगता येत नाही. एकनाथ शेतीत विविध प्रकारचे प्रयोग करतो. शेतकरी संघटनेचे नरुभाऊ, तेजराव तात्या. समाधान चांदणे यांच्या संपर्कात येतो. त्यांच्याशी शेतीच्या प्रश्नांसंबंधी त्याची चर्चा होत राहते. त्यांच्याशी त्याचे जिव्हाळ्याचे नाते बनते. शेतकऱ्यांचे प्रश्न, समस्या यावर नरू भाऊंच्या पुढाकाराने सांजोळ मध्ये चर्चासत्र घेतले जाते. त्यामध्ये सूत्रसंचालनाचे काम एकनाथ करतो. शेतकर्यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलनात भाग घेतो. त्यांच्यामध्ये तो भाषण करतो. त्यामध्ये त्याला अटक होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी संघर्ष, लढे, मोर्चे यामध्ये तो भाग घेतो. शेतीतील अवघड कामे तो करतो. ती करताना त्याला शारीरिक यातना होतात. शेतकरी संघटनेच्या मेळाव्यात भाषण करताना तो शेतकरी बांधवांना म्हणतो, "शेतकरी बांधवांनो, सगळीकडे आज शेतकरी संघटनेच्या वतीने हे आंदोलन होत आहे. आज शेतकरी पायदळी तुडवला जात आहे. नापिकी, व्याज, कर्ज यांच्या ओझ्याखाली तो दमून जात आहे. शेती करणारे दिवसेंदिवस गरीब होत आहेत. नुसते गरीब नाही, भिकारी होत आहेत. हात पुढ करून भीक मागणाऱ्या भिकाऱ्यात अन शेतकऱ्यांत आता काहीच फरक राहिलेला नाही… अस्मानी सुलतानी संकटाने ग्रस्त झालेला आपला शेतकरी बांधव आत्महत्या करीत आहे. तरी त्याच्या मरणावर रडणारं कोणी नाही. त्याच्यावरचा अन्याय थांबलेला नाही आणि समाज मुका, बहिरा, आंधळा झाला आहे. त्याला जागे करण्यासाठी आपला हा चक्काजाम आहे." ('बारोमास' पृ. ३४०–३४१) एकनाथ च्या या प्रभावी भाषणामुळे सर्वच शेतकऱ्यांना त्याच्याबद्दल आपुलकी वाटू लागते.

एकनाथची पत्नी अलका त्याला ही शेतातील कामे करायचे सोडून शहरात जाऊ म्हणते. वाटणीला येणारी शेती विकून दुकान टाकू नाही तर कसलाही धंदा करूया, खरं हे काम तुम्ही सोडून द्या. घरच्यांना विरोध करून शेतीची वाटणी करणे त्याला जमत नाही. "नोकरी असती तर आपण जिच्यावर जीवापाड प्रेम करतो ती अलका आपल्या जवळ असती. दोघांचा सुखी संसार, एखाद्या कॉलनीत पॉश घर… एवढी सुंदर आपली बायको, पण तिचं सुख आपल्याला नाही. आपलं तिला नाही. वनवा

आहे फक्त. आपलं हे सुख कोणी लुबाडलं? बापानं? शेवंता मायने? आता मध्यासाठी जे केलं ते आपल्यासाठी केलं असतं तर आपल्या आयुष्याचं सोनं झालं असतं. आता नशिबात फक्त जळण... जळून कोळसा होण... कोळसाही जळत राहिला तर मग राख... फक्त राख... आयुष्य भोगून झाल्यावर शेवटी होते भेसूर स्मशानातल्या सरणावर जीवनाची थैलीभर राख... ('बारोमास' पृ. २९६–२९७) याठिकाणी एकनाथला आपल्या आयुष्याच्या अर्थहीनतेची आणि निरर्थकतेची तीव्र जाणीव झाली आहे.

एकनाथला मधु शेतीच्या कामात काहीच मदत करत नाही. स्वत: एकनाथला आणि अलकाला त्रास देतो. एकनाथ मधुची भांडणे होतात. त्यामध्ये एकनाथलाच मार बसतो. अलका मग कायमची माहेरी गेल्यामुळे एकनाथ एकाकी पडतो. मधूच्या नोकरीसाठी कल्याणीचा मळा गहाण ठेवतो. मळ्यावर काढलेले पैसे ज्याच्याजवळ नोकरीसाठी भरले जातात त्या उत्तम ठोकरेचा अपघाती मृत्यू होतो. त्याला दिलेले पैसे बुडतात. एकनाथ उदास होतो. किंखेडच्या त्याच्या रावसाहेब दाजीने गळफास लावून आत्महत्या केल्यामुळे तो अस्वस्थ होतो. कल्याणीचा मळा गेल्यामुळे त्याचे वडील सुभानराव डोहात उडी घेऊन जीव देतात. या सर्व घटना, प्रसंगाचे परिणाम एकनाथच्या मनावर होतात. एकनाथ च्या व्यक्तिरेखेबद्दल प्रा. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, "एका बाजूला काव्याची आवड आणि काव्य लिहिण्याची ताकद,तर दुसऱ्या बाजूला सर्वस्वी अभावग्रस्त धगधगीत वास्तव यातली मानसिक तडफड ताकदीने व्यक्त केली आहे. लेखकाने एकदाच्या मनाचे अतिशय सुरेख पद्धतीने तरलस्पर्शी वर्णन केलेले आहे. तसेच त्याच्या मानसिकतेचंही मोठं प्रभावी चित्र लेखकाने रेखाटलेले आहे.

**(२) अलका :–**

'बारोमास' मध्ये आलेली अलकाची व्यक्तिरेखा लेखकाने अतिशय प्रभावीपणे साकार केलेली आहे. भौतिक सुखाचे आकर्षण असणारीआणि बदलत्या स्त्रीची प्रतिनिधिक म्हणजे अलका होय. अलका मोहाडी शहरात वाढलेली असते. तिचे शिक्षण बी.एस.सी पर्यंत झालेले असते. एकनाथला नोकरी लागेल म्हणून त्याच्याशी तिचे लग्न होते. पण एकनाथच्या नोकरीसाठी डोनेशन द्यायला त्याच्या आई–वडिलांकडे पैसे नसल्यामुळे व स्वत:ची शेती विकण्याची इच्छा नसल्यामुळे त्याला नोकरी लागत नाही. त्यामुळे नाईलाजाने तो शेती करतो. अलकाला सासरी सांजोळात राहणे नको वाटते. मातीचे जुने घर तिला आवडत नाही.

एकनाथने शेतीची वाटणी करून वाट्याला आलेली शेती विकून मोहाडीत काही व्यवसाय करावा ही अलकाची इच्छा एकनाथ पूर्ण करू शकत नाही. म्हणूनही ती त्याच्यावर संतापते, चिडते एकनाथ च्या घरात तिच्या मनासारखे काहीच नसते तेथील कष्ट तिला ढोरासारखे वाटतात आणि एकनाथ च्या घरातली माणसे तिला जनावरासारखी वाटतात. एकनाथ बरोबरचा शारीरिक संबंध तिला बलात्कार वाटतो व आपल्या पोटी जन्माला येणाऱ्या मुलाला काहीही भविष्य असणार नाही या भावनेपोटी ती स्वत:ला मूल होऊ देत नाही. त्यामुळे एकनाथला शारीरिक संबंधाला ती नकार देते. क्यु रेनियम करणे, कॉपरटी बसवून घेणे इत्यादी उपाय ती करते. एकनाथने शारीरिक संबंधाची इच्छा व्यक्त केली असता तिने केलेला प्रतिकार यादृष्टीने पाहण्यासारखा आहे. एकनाथला ती म्हणते, "लाज नाही वाटत जवळ यायला. शरीराचे चोचले पुरवायला, वासना जिरवायला बायको पाहिजे. अन तिच्या मनाचा काही विचार नाही. कोणत्या अवस्थेत जगते मी या कैदखाण्यात माझं मलाच माहित. स्वत:तर शंभर रुपयाची वस्तू घेऊन देत नाही. बापाने बांगड्या दिल्या लग्नात त्याच्यावरही डोळे ठेवतात मेले. वावराच्या लागवडीसाठी बांगडे विकायच्या म्हणते ती महाराणी... अन तुही ऐकून घेतो नेळभट, हलकट... पलंगावर याची लाज कशी वाटत नाही. माणसानं असावं पण एवढही बेशरम नसावं..." ('बारोमास' पृ. २०) अलकाच्या या बोलण्यातून तिचा एकनाथ व शेवंतामाय विषयीचा राग व्यक्त होतो. गाडी, बंगला, टीव्ही, फ्रीज, सोफा या भौतिक सुखांनाच सुख मानणारी अलका एकनाथ सारख्या अत्यंत संवेदनशील मनाच्या पतीचे प्रेम कधी समजून घेत नाही. एकूणच अलकाची व्यक्तिरेखा बदलणार्या स्त्रियांच्या दृष्टिकोनाचे दर्शन घडवते.

शेतीची कामे वाढली म्हणून एकनाथ आईच्या इच्छेखातर अलकाला आणायला मोहाडीला जातो. वडिलांच्या इच्छेखातर ती एकनाथ बरोबर इच्छा नसताना सांजोळात येते. पण थोड्याच दिवसात तिचे मधुशी भांडण होते. मधु तिच्या थोबाडीत मारतो. अलका खाली कोसळते. जेव्हा ती शुद्धीवर येते तेव्हा सगळ्यांना पोलिसांत खेचण्याची धमकी देते व कायमची माहेराला जाते.

अशाप्रकारे अलका चे कादंबरीत आलेले चित्र वास्तवदर्शी असून आज पूर्वीसारखे कष्ट करणारे स्त्रीचे रूप बदलले आहे. केवळ आपल्या सुखापुढे दुसऱ्याच्या कशाचाही विचार न करणारी अलका म्हणजे पाश्चात्य संस्कृतीचा येथील समाजावर कसा परिणाम होत आहे याची निदर्शक आहे.

**(३) सुभानराव :—**

'बारोमास' या कादंबरीतील सुभानराव हे पात्र पारंपरिक पद्धतीने शेती करणाऱ्या वडिलांना, नानू आजाला विरोध करून, हायब्रीड शेतीचा पर्याय सुभानराव निवडतात. शेतीचे काम सतत करीत राहणे,राबल्याशिवाय व कष्टाशिवाय काही मिळत नाही, शेतीतून जेवढे उत्पन्न निघेल त्यावर गुजराण करणे एवढेच त्यांना माहीत आहे. शेती करण्यासाठी पैसे कमी पडल्यावर व्याजाने काढायचे व शेतीच्या उत्पन्नातून काटकसर करून फेडत बसणे असा त्यांच्या ठिकाणी प्रामाणिकपणा दिसतो. शांत, संयमी, समजूतदार, सुसंस्कृत, अध्यात्मिक वृत्तीच्या सुभान रावांवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव असतो. नानु आजा प्रमाणे त्याचेही शेतीवर अतोनात प्रेम आहे. नानू आजा गावरान धान्याशिवाय काहीही खात नाही. तेव्हा त्याच्यासाठी गावरान धान्य पेरतात. यातून त्यांचे आपल्या वडिलांविषयीचे प्रेम व्यक्त होते.

सुभानराव शेतकरी असले तरी शिक्षणाचे महत्त्व त्यांना माहित आहे. म्हणूनच आपल्या दोन्ही मुलांना ते पोटाला चिमटा लावून शिकवतात. आपल्या मुलांनी शिकून मोठे व्हावे ही मनिषा ते बाळगून असतात. थोरल्या मुलाला एकनाथला एम.ए., बी.एड, तर धाकटा मधूला कृषी पदवी पर्यंत शिक्षण देतात. दोघांनाही नोकरीच्या संधी उपलब्ध असताना केवळ पैसा उभा करू न शकल्यामुळे आपल्या दोन्ही मुलांची नोकरीची संधी हुकते. शेत विकून नोकरीसाठी डोनेशन देणे हे त्यांच्या मनाला पटत नाही. पण मधूच्या हट्टापायी शेवटी कल्याणी चा मळा महाकाळाकडे दोन लाख रुपयात गहाण ठेवावा लागतो. सततच्या नापिकीमुळे कर्जाचा डोंगर वाढत जातो. शेवटी कल्याणीचा मळा महाकाळाच्या घशात जातो.

ज्या मळ्यावर आपण आयुष्यभर जिवापाड प्रेम केले, आपल्या वाडवडिलांनी जो सांभाळला तोच आपल्या हातून गेला याचे दु:ख सुभानरावला सहन होत नाही. आता आपल्या जगण्याला काहीच अर्थ नाही म्हणून ते कीटकनाशके पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात. त्यातून त्यांना कसेबसे वाचविले जाते. तेव्हापासून ते मनाने खचून जातात, त्यांचे चित्त कशातच लागत नाही. शेवटी जांबुळ खोऱ्यातल्या डोहात उडी घेऊन आपली स्वत:ची जीवन यात्रा संपवतात.

डॉ. प्रमोद मुनघाटे हे सामाजिक आणि कौटुंबिक परिस्थितीचा बळी ठरलेल्या सुभानरारावां विषयी म्हणतात, “एकनाथचा बाप सुभानराव कादंबरीच्या अखेरीस आत्महत्या करतो, तो जागतिकीकरणाच्या बाजारीकरणाच्या प्रत्यक्ष बळी आहे. भांडवलशाहीच्या प्रभावाखाली आलेले राजकारण, देशाचे अगतिक आर्थिक धोरण, खाजगी बँका, शहरातील उपभोग्य वस्तूंच्या खरेदी विक्रीत अडकलेला पैसा, नवश्रीमंत यांचे व धनदांडग्यांचे ग्रामीण भागाजवळील जमिनी खरेदी विक्रीचे व्यवहार, त्यांचे रिसॉर्ट, वॉटर पार्क यात असुरक्षित, असंघटित शेतकऱ्याला काहीच स्थान राहिले नाही. दरवर्षीचे अवर्षण, बी—बियाण्यांची मारामार, कर्जाचे ओझे यामुळे काही वर्षात असंख्य सुभानरावांनी आत्महत्या केल्या. अर्थतज्ञ आणि विचारवंत या आत्महत्यांची कारणे शोधत आहेत. पण त्यांच्यासकट सगळी व्यवस्था जागतिकीकरणाच्या महाप्रचंड अजगरा सारख्या जागतिक अर्थव्यवस्थेचा भाग झाल्याने आत्महत्यांचे सत्र काही थांबलेले नाही. सुभानरावांच्या रुपाने लेखकाने शेतकऱ्यांच्या आजच्या समकालीन जीवनाचे वास्तव आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या शोधाची करूण कहाणी सांगितलेली आहे.

**(४) शेवंता माय :—**

शेवंता माय या सुभानराव यांच्या पत्नी महानुभावीय होत्या. शेवंता माय ही साक्षात कष्टकरी भारतीय शेतकरी स्त्रीचे प्रातिनिधिक रूप आहे. शेवंतामाय ही ग्रामीण स्त्रीचे खरंखुरं प्रतिनिधित्व करणारी व्यक्तिरेखा आहे. ती नवऱ्याबरोबर बारोमास शेतामध्ये कष्ट करणारी आणि दु:ख भोगणारी स्त्री आहे. सदानंद देशमुख यांनी तिची व्यक्तिरेखा ही पत्नी, आई, सून आणि सासू या विविध अंगांनी यशस्वीपणे चित्रित केलेली आहे. शेवंताबाई च्या माध्यमातून लेखकाने ग्रामीण भागातील स्त्रीजीवनाची होरपळ आणि ससेहोलपट प्रभावीपणे मांडलेली आहे. 'बारोमास' कादंबरीतील शेवंताबाई या व्यक्तिरेखे विषयी वर्णन करताना प्रा. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, “ही सुनेला छळणाऱ्या, एकनाथ व मधु यात मधुची कड घेणाऱ्या, मूलीच्या नवर्यासाठी सुनेचे दागिने गहाण टाकण्याचा हट्ट करणाऱ्या आणि जावयाच्या आत्महत्येनंतर त्याच्या मुलाला आपल्या मुलाला एकनाथला जबाबदार धरणार्या शेवंता मायची ही शोकांतिका आहे. कारण लेखकाने तिच्या वरकरणी अन्याय वाटणाऱ्या कृत्याच्या पार्श्वभूमीच, तसंच तिच्या वात्सल्यतेचही प्रभावी चित्रण केलं आहे. तिचे अनेक दोष तिच्या स्वार्थातून नव्हे तिच्या वात्सल्य भावनेतून निर्माण झालेले आहेत.

एकनाथला नोकरी लागत नाही त्यामुळे ती ज्या सुखाच्या दिवसाची वाट पाहते ते कधीच येत नाहीत. उलट तिचे कष्टाचे दिवस तसेच चालू राहतात. तिला आपल्या बळीराम या भावाची मुलगी एकनाथ साठी करून आणावी असे वाटते. जुन्या विचारात वाढलेली शेवंता माय घरच्या कठीण परिस्थितीत तिने आपले सर्व दागिने मोडले.

अलकाने हे आपले दागिने घरातल्या अडीअडचणी साठी दिले पाहिजे असे तिला वाटते. भावाची मुलगी केली नाही म्हणून शेवंता माय नाराज होते. त्या गोष्टीचा वचपा ती आता अलकाशी वाईट वागून काढते. अधून मधून म्हणते ही की, "माझ्या भावाची पोरगी केली असती तर ती वावरात राबली असती. कचकटून काम केलं असतं. घरात, वावरात दणदण लक्ष्मी नांदली असती. ही आणली माय करून दिसायला देखणी अन कामाले पोकळ फुकनी." ('बारोमास' पृ. १६)

पारंपारिक विचाराचा पगडा तिच्या मनावर असल्याने अलकाचे गाऊन घालणे तिला आवडत नाही. 'हा काय बोंगा घातला' म्हणत ती अलकाला अशा गोष्टींपासून परावृत्त करते. तर डोक्यावर पदर न घेण्यात येणाऱ्या अलकाचे वागणे पाहून 'तुझ्या बायकोच्या डोक्याला खेडे ठोकुन घे' असे ती एकनाथला सांगते. एकूणच पूर्वापार संस्कार आपण जपले आहेत ते आपल्या सुनेनेही जपावेत अशी तिची इच्छा आहे. म्हणूनच अलकाने पोलिसात जाण्याची धमकी देताच ती घाबरते. शेवंता मायला नातवाची खूप हाऊस आहे. एकनाथ ला मूल व्हावे असे तिला मनापासून वाटते.

जावयाने आत्महत्या केल्यानंतर एकनाथ ने अलकाच्या बांगड्या विकून जावयाला मदत केली असती तर आज ही वेळ आली नसती. एकनाथच आपल्या जावयाच्या मृत्यूला कारणीभूत आहे असा ती एकनाथवर आरोप करते. तिची चीड, संताप हे सगळे काही कुटुंबाप्रती असलेल्या तळमळीतून व्यक्त होत असते. मधूने शेत गहाण ठेवल्यानंतर आलेल्या दोन लाख रुपयांपैकी एक लाख रुपये ती आपल्या आई जवळ शेवंता माय जवळ देतो. त्या रुपयांची ती डोळ्यात तेल घालून जपणूक करते. त्यावेळी तिची झोप उडते. तिची तब्येत बिघडते. शेवटी मधूची फसवणूक होऊन एक लाख लुबाडल्याचे जेव्हा तिला समजते तेव्हा तिच्यावर आभाळ कोसळते. तिच्या साऱ्याच स्वप्नांवर पाणी फिरते. सुभानराव जेव्हा आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात व आपली जीवन यात्रा संपवतात तेव्हा तिला सारे जीवनच अंधकारमय वाटू लागते. 'पुढे तिला सगळेच अंधुक अंधुक दिसू लागलं'. या वाक्याने कादंबरी संपते.

आयुष्यभर कष्ट उपसणारी, आपल्या लेकरांवर आभाळागत माया करणारी, थोडीशी तापट पण अत्यंत मायाळू, कष्टाळू, दयाळू शेवंता माय आपल्या अथक कष्टाने आणि आभाळमायेणे वाचकांच्या लक्षात राहते.

**(५) मधु :–**

मधु हा सुभान रावांचा धाकटा मुलगा व एकनाथचा लहान भाऊ म्हणून ही व्यक्तिरेखा या कादंबरीत येते. त्याने ग्रामसेवकाचे प्रशिक्षण पूर्ण केलेले असते पण त्याला नोकरी लागत नाही. कुठून तरी आपल्याला अचानक धनलाभ व्हावा. त्यामधून आपले कायमचे दारिद्र्य निघून जावे. असे त्याला वाटत असते. त्यासाठी तो आपली स्वत:ची सोनेरी टोळी तयार करतो. आणि गुप्तधन शोधण्यासाठी रात्रीची भटकंती करत फिरत असतो. आज ना उद्या आपल्याला गुप्तधन सापडेल व आपली कायमचीच बेकारी निघून जाईल असे त्याला वाटत असते. गावातील लोक त्याला 'सोनेरी टोळीचा प्रमुख' म्हणून ओळखतात. त्याला या कामात यश मिळत नाही. पुढे तो आपल्याच शेतातील बांधावरचे झाडे विकतो व आपले शौक पूर्ण करतो. शेतात काम करीत नाही.

मधु तलाठ्याच्या नोकरीसाठी लेखी परीक्षा देतो. मुलाखत झाल्यानंतर त्याला पन्नास हजार रुपये मागितले जातात. पण पन्नास हजार रुपये दिले नसल्यामुळे त्याची तलाठी पदी निवड होत नाही. नोकरी मिळत नसल्यामुळे तो निराश होऊन वाईट मार्गाचा अवलंब करीत असतो. बनुबा मांत्रिकाच्या नादी लागून तो मित्रांच्या मदतीने गुप्तधन शोधण्यासाठी रात्री–अपरात्री फिरतो. परंतु धडपड करूनही त्याला त्यात फारसे यश मिळत नाही. आंघोळीचा साबण दिला नाही म्हणून अलकाच्या गालावर चापट मारणारा मधु आणि त्यानंतर झालेल्या भांडणात आपल्या मोठ्या भावावर हात उगारणारा मधून हा आजच्या बंडखोर तरुणांचे प्रतिनिधिक उदाहरण आहे.

तापट व हट्टी स्वभावाचा हा मधून आठ दिवस तसाच उपाशी झोपून राहतो. अन्न पाण्याचा एक थेंबही घेत तर नाहीच उलट तपासणीसाठी आलेल्या डॉक्टरचेही ऐकत नाही. आई– वडील त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न करतात, तर तोच त्यांना "त मंग मी तुले आखरे शेवटचं सांगतो मा, तू सांग तुह्या नवऱ्याले अनय या पोराले बीज समजावून. एका दिवसाची मोहलत देतो मी तुम्हाले आता तुम्ही राजी झाले तर बरं, नाहीतर मी महा जीवच देतो. अन दोघाईच्या नावानं चिठ्ठी लिहून ठेवतो. या हिनं मले जीव द्या लावला म्हणून." (बारोमास पृ. २४८) अशी धमकी तो आपल्या आई–वडिलांना देतो.

शेवटी तर तो रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांची लूटमार करतो. गुंड मवाल्यासारखे त्याचे वागणे सर्व घरासाठी त्रासदायक ठरते. 'बारोमास' मधील मधुच्या व्यक्तिरेखे कडे सूक्ष्मपणे पाहिल्यास, शिक्षण घेऊन विषण्ण झालेली तरुण पिढी कशा प्रकारे वाममार्गाला जात आहे हे आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. मधूच्या माध्यमातून

लेखकाने सुशिक्षित तरुणांच्या बेकारीचा प्रश्न किती गंभीर रूप धारण करीत आहे ही आजची वास्तविकता मांडलेली आहे

**निष्कर्ष :**

१. कादंबरीकाराचा पात्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक असून पात्रांवर खोल संस्कार करणारा असतो.

२. सदानंद देशमुख यांनी 'बारोमास' कादंबरीतू ग्रामीण जीवनातील प्रश्न मांडले आहेत.

३. 'बारोमास' अस्सल ग्रामीण कादंबरी असून साहित्य अकादमी पुरस्कृत अत्यंत गाजलेली कलाकृती आहे.

४. सदानंद देशमुख यांनी नोकरीसाठी धडपडणाऱ्या बेकार तरुणांचा प्रश्न 'बारोमास' मध्ये वास्तवाच्या पातळीवर मांडलेला आहे.

५. 'बारोमास' मधून शेतकऱ्यांचे न संपणारे दु:ख मांडले आहे.

६. ग्रामीण भागातील बदलत्या स्त्रीचे रूप अलकाच्या व्यक्तिरेखेतून लेखकाने मांडले आहे.

७. सुभानरावाच्या रुपाने लेखकाने शेतकऱ्यांच्या आजच्या समकालीन जीवनाचे वास्तव आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या शोधाची करूण कहाणी सांगितलेली आहे.

८. आयुष्यभर कष्ट करणारी, आपल्या लेकरांवर आभाळागत माया करणारी, वेळ प्रसंगी कणखर, तापट व्यक्तिरेखा शेवंतामायच्या रूपाने या कादंबरीत उभी राहते.

९. मधूच्या माध्यमातून लेखकाने सुशिक्षित तरुणांचा बेरोजगारीचा प्रश्न किती गंभीर रूप धारण करीत आहे ही आजची शोकांतिका मांडली आहे.

**संदर्भ :**

सौ. सायली लाखे– पिदाळी, 'कादंबरी एक विचार', नाथे पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २०१७

सदानंद देशमुख, 'बारोमास', कॉंटिनेंटल प्रकाशन पुणे–३०, तृतीय आवृत्ती, २००७

प्रा.डॉ. तानाजीराव पाटील, 'मराठी कादंबरी: समीक्षा', डायमंड पब्लिकेशन्स– पुणे, प्रथम आवृत्ती, ५ फेब्रुवारी २००९

पाटील विजय (संपादक), 'बारोमास एक अन्वयार्थ', जागतिकीकरणाचा ग्रामीण एक्स–रे, प्रमोद मुनघाटे, कॉंटिनेंटल प्रकाशन, विजय नगर, पुणे–३०, प्रथमावृत्ती २०११, पृ. २२४–२२५